N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** नशिराबाद **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0186 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/10/2020 20:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 08/10/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/10/2020

**Time From (वेळेपासून):** 15:25 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/10/2020 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 013 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/10/2020 20:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.50 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नशिराबाद पोलीस स्टेशन, नशिराबाद ,जळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हाजी सलीमखान अरमानखान

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं 1117/5 साठ घर एरीया ,पाळधी ,धरणगाव ,नशिराबाद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं 1117/5 साठ घर एरीया ,पाळधी ,धरणगाव ,नशिराबाद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतीष रमेश पाटील | | | 1. सिध्दीविनायक कॉलनी ,गट नं 191प्लॉट नं 8 ,जळगाव ,जळगाव , नशिराबाद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | हस्तगत लाचेची रक्कम 5000 रु त्यात 500 रु दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी हाजी सलीमखान अरमानखान वय 50 वर्ष धंदा खा.नोकरी राह प्लॉट नं 1117/5 साठ घर एरीया पाळधी ता.धरणगाव जि जळगाव समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहतो, मी जळगाव शहरातील आय के ट्रॅव्हल्स येथे मॅनेजरचे काम करतो सदर ट्रॅव्हल्स चे मालक श्री इमरान खान शरीफ खान हे असुन ते माझे मित्र देखील आहे.त्यांचेकडे सध्या दोन लक्झरी बसेर असुन सदर बसेस ची देखभाल दुरुस्ती व भाडेतत्वावर देणेबबातचा व्यवहार मॅनेजर म्हणुन मी पाहतो मी दि 8/10/2020रोजी जळगाव अँन्टी करप्शन ब्युरोचे पोनि श्री एस के बच्छाव साहेब यांच्यकडे लाचे संदर्भात तक्रार दिली ती खालील प्रमाणे आहे.दि 18/6/2020रोजी ट्रॅव्हल्स चे मालक इमरान खान व मी असे नशिराबाद येथे गेलो असता नशिराबाद जवळील भागपुर प्रकल्प येथे कामास असलेले श्री छोटन कुमार दास यांनी इमरान खान व मला सांगितले की, मी व माझे इतर सहकारी असे एकुण 47 इसमांना दि 6/7/2020 रोजी नशिराबाद येथुन रांची बरही झारखंड राज्य येथे जावयाचे आहे. तेव्हा इमरान खान व मी त्यांना सांगितले की, सदर दिवशी आमची लक्झरी बस उपलब्ध असुन तुम्हाला प्रत्येकी 2500 रु सिट प्रमाणे एकुम 47 इसमांचे 117500 रु लागतील असे सांगीतले त्यानुसार सदरचा व्यवहार त्याना मान्य झाला त्यांनी सदर दिवशी 25000 रु अँडव्हांन्स माझ्याकडे दिले होते त्यानंतर दि 1/7/2020 रोजी श्री छोटन कुमार दास यांनी कळविले की, आम्ही फक्त 30 इसम रांची येथे जाण्यासाठी तयार आहोत तेव्हा त्यांना पुर्ण 47 शिट असल्याशिवाय अर्थीक दृष्ट्या परवडत नसल्याचे सांगुन प्रत्येकी 3500 रु सिट प्रमाणे भाडे दिले तर आपणास घेवुन जाता येईल असे सांगीतले तेव्हा त्यांनी आम्हाला ते परवडत नसल्याचे सांगितले व सदर व्यवहार रद्द केला त्यावेळी त्यांनी 25000रु अँडव्हांन्स दिलेले पैसे परत मागीतले तेव्हा त्यांना सध्या आमच्या जवळ पैसे नसल्याने तुमचे पैसे नंतर देवु असे सांगीतले होते.मला दि 2/10/2020 रोजी रात्री मोबाईल क्र 9923242321 यावरुन माझे मोबाईल फोन क्र 8177875995 यावर फोन आला व मला सांगितले की, मी नशिराबाद पो.स्टे येथुन पोलीस हवालदार सतीष पाटील बोलत असुन तुमच्या विरुध्द 25000रु ची फसवणुक केली म्हणुन माझ्या कडे अर्ज आला असुन सदर अर्जाच्या चौकशी साठी तुम्ही उद्या नशिराबाद पोलीस स्टेशन येथे हजर रहा असे सांगीतले तेव्हा मी त्यांना मी सध्या मुंबई येथे असल्याचे सांगीतले व मी दि 6/10/2020 रोजी पावेतो आपणाकडे येईल असे सांगीतले तेव्हा त्यांनी तुम्ही जर 6/10/2020पावेतो जर आले नाही तर विचार करुन ठेवा तुमचे वर फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन जेल मध्ये टाकुन देईल असे सांगुन फोन बंद केला त्यानंतर मी दि 6/10/2020 रोजी नशिराबाद पोलीस स्टेशन येथे जात असतांना मला हायवे रोडवर पोलीस हवालदार सतीष पाटील यांचा फोन आला तेव्हा मी त्यांना आपणाकडे येत असल्याचे सांगीतले तेव्हा त्यांनी पोलीस स्टेशन च्या बाहेर हायवे रोडवर थांबा मी तेथे येतो असे सांगीतले त्यानंतर लागलीच पोलीस हवालदार सतीष पाटील हे माझ्याजवळ आले व त्यांनी मला सांगितले की, तुमच्या विरुध्द

25000 रु ची फसवणुक केली असा अर्ज आला असुन त्या अर्जावर मी तुमच्या विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन तुम्हाला जेल मध्ये टाकेल अशी भिती दाखवुन तुमच्या विरुध्द जर गुन्हा दाखल होवु द्यायचा नसेल व अर्ज फाईल करावयाचा असेल तर अर्जदार श्री छोटन कुमार यांचे अँडव्हान्स घेतलेले 25000 रु परत देवुन मला 10000 रु आणुन द्या मी लागलीच तुमचा अर्ज फाईल करतो व तुमच्या विरुध्द गुन्हा दाखल होवु देणार नाही असे सांगीतले तेव्हा पोलीस हवालदार सतीष पाटील हे माझ्याकडे 10000 रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले त्याबाबत मी तक्रार दिली होती. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले त्यानंतर दोन्ही पंचाची सापळा पथकाची व माझी ओळख करुन दिली मी दिलेली तक्रार दोन्ही पंचाना वाचायला दिली त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील कारवाई नशिराबाद येथे महामार्गावर बंद असलेल्या काझी पेट्रोलपंपाजवळ करावयाचा निर्णय घेतला तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार मी माझे मो. सा ने नशिराबाद येथे महामार्गावरील बंद असलेला काझी पेर्टोलपंपाजववळ गेले .तसेच अँन्टी करप्शन ब्युरो चे पोलीस उपअधिक्षक श्री जि.एम ठाकुर, बच्छाव साहेब दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाचे सदर ठिकाणी आले. त्यांनतर बच्छाव साहेब यांनी मला व पंचा क्र 01 यांना थोडक्यात सुचना दिल्या त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड व नविन सेल टाकुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनी मुद्रीत करण्यात आले होते त्यानंतर बच्छाव साहेबांनी मला पंच क्र 01 यांचेसह नशिराबाद पो.स्टे पोलीस हवालदार सतीष पाटील यांना भेटण्यासाठी नशिराबाद पो.स्टे येथे पाठविले होते सदर ठिकाणी जावुन मी पोलीस हवालदार सतीष पाटील यांची भेट घेतली त्यावेळी माझेत व पोलीस हवालदार सतीष पाटील यांच्येत माझ्या कामाविषयी बोलणी झाली तेव्हा पोलीस हवालदार सतीष पाटील यांनी प्रथम माझ्या कडे 10000 रु लाचेची मागणी केली त्यानंतर मी त्यांना लाचेची रक्कम कमी जास्त करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी तडजोडी अंती 5000 रु लाचेची मागणी केली त्यानंतर मी व पंच क्र 01 असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो त्यानंतर माझे व पोलीस हवालदार सतीष पाटील यांचेमधील फक्त महत्वाचे संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले तेव्हा बच्छाव साहेब यांची लाच मागणी बाबत खात्री झाल्याने त्यांनी लागलीच पुढील सापडा कारवाई सलगपणे करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोलीस हवालदार सतीष पाटील यांना देण्यासाठी मी माझे घरुन आणलेली 5000 रु रक्कम (त्यात 500रु दराच्या 10 नोटी) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले.तेव्हा बच्छाव साहेब यांनी सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या डाव्या खिशाता अलगत ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र 01 अशांना थोडक्यात सुचना दिल्या त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड व नविन सेल टाकुन माझे कडेस देवुन मला पंच क्र 01 यांचे सह पोलीस हवालदार सतीष पाटील यांना भेटुन लाचेची रक्कम देण्यासाठी नशिराबाद पो..स्टे येथे पाठविले होते तेव्हा बच्छाव साहेब यांनी नशिराबाद पोलीस स्टेशन च्या आजुबाजुस सापळा लावला होता लावला होता तेव्हा मी पंच क्र 01 यांचे सह पोलीस स्टेशनला जावुन पोलीस हवालदार सतीष पाटील यांची भेट घेतली तेव्हा माझ्यात व त्यांच्यात कामाविषयी चर्चा झाली त्यानंतर मी माझे शर्टच्या पुढील डाव्या खिशात असलेली लाचेची रक्कम 5000रु उजव्या हाताने खिशातुन बाहेर काढुन पोलीस हवालदार यांच्यापुढे धरली असता सतीष पाटील यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन घेतली त्यानंतर मी ठरवुन दिल्याप्रमाणे सापळा पथकास इशारा केला.तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी पोलीस हवालदार सतीष पाटील यांना 15.32 वा रंगहात पकडले.तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळ्यातील डिजीटल व्हईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पोलीस हवालदार सतीष पाटील यांना त्याची व सापळा पथकाची ओळख सांगुन त्यांना त्यांचे पुर्णनाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री सतीष रमेश पाटील वय 43 वर्ष व्यवसाय नोकरी पोलीस हवालदार 2611 नेम नशिराबाद पो.स्टे राह गट नं 191प्लॉट नं 8 सिध्दीविनायक कॉलनी पिंप्राळा जळगाव असे सांगीतले त्यानंतर पुढील कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव यांचे कार्यालयात करण्यात आली सदर कार्यालयातील एक रुम मध्ये माझे , पोलीस हवालदार सतीष पाटील व दोन्ही पंचाच्या हाताची अल्ट्राव्हयलेट बँटरीच्या च्या प्रकाशात तपासणीकेली त्यानंतर पुढील उर्वरीत सापळात कारवाई केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे. अशा प्रकारे पोलीस हवालदार सतीष पाटील यांनी दि 8/10/2020रोजी पंचासमक्ष माझ्या विरुध्द असलेल्या अर्जावरुन माझे विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल न करता सदरचा अर्ज फाईल करण्याच्या मोबदल्यात माझ्याकडेस तडजोडी अंती 5000रु लाचेची मागणी केली सदर लाचेची रक्कम पोलीस हवालदार सतीष पाटील यांनी दि 8/10/2020रोजी 15.32 वा नशिराबाद पो.स्टे आवारात असलेल्या पोलीस अराम कक्ष येथे स्वतः स्विकारली म्हणुन माझी पोलीस हवालदार सतीष पाटील यांच्या विरुध्द कायेदशीर फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): PRAVIN Pundlik SALUNKE(I (Inspector)) / DGPPPSM8105 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): PRAVIN Pundlik SALUNKE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPPPSM8105